Shri Sharda Bhavan Education Society

# INDIRA GANDHI (SR.) COLLEGE.CIDCO, NEW NANDED

# National Service Scheme

## Annual Report of NSS

**(Academic Year 2021 -2022)**

**Submitted by**

**NSS Coordinator**

1. **Dr. Bhagwat N. Pastapure.**
2. **Dr. Vishal B. Maske**

**SUBMITTED TO**

**PRINCIPAL**

**Indira Gandhi (Sr.) College. CIDCO, New Nanded**

# NSS ADVISORY COMITIES

1. Dr. Pastapure B.N. — Coordinator
2. Dr. Maske V.B. — Member
3. Dr. Pawle R.G. — Member
4. Dr. sumant Tugonkar — Member
5. Dr. Rathod B. A. — Member

## Volunteers involved in various activities of NSS

| SR. NO | STUDENT NAME | CLASS | DISTRICT/ UNIVERSITY/ STATE/ NATIONAL | EVENT NAME | DURATION | PARTICIPATION /RANK |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | GHOGRE AKASH | B.SC.II | UNIVERSITY | TREE PLANTATION | 05 /06/202 TO 15/06/2021 | PARTICIPATION |
| 2 | SAGAR JAYRAM INGLE | B.SC.III | UNIVERSITY | TREE PLANTATION | 05 /06/2021 TO 15/06/2021 | PARTICIPATION |
| 3 | SHEJAL SAINATH KAVTIKWAR | B.SC.II | COLLEGE | BEST N.S.S. VOLUNTEER AWARD | 14 JULY 2022 | I |

इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे या शैक्षणिक वर्षाची सुरुवात 1 एप्रिल 2021 ते 30 मार्च 2022 पर्यंत निश्चित करण्यात आले या शैक्षणिक वर्षामध्ये नियमित कार्यक्रमांतर्गत वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांतर्गत सर्व उपक्रम त्या मध्ये दूर नेत्यांच्या जयंती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन जिल्हा स्तरावरील उपक्रम आदींमध्ये स्वयंसेवकांचा सहभाग, वृक्षारोपण, श्रमदान आणि इतर वर्षभरात राबविलेल्या विविध उपक्रमांचा सविस्तर वृत्तान्त येथे देत आहोत 1 एप्रिल 2021 ते 30 मार्च 2022 दरम्यानच्या कालावधीत महाविद्यालयात थोर नेत्यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करून त्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आले. शिवाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विविध दिवस यांचेही महत्त्व विद्यार्थ्यांना विविध उपक्रमाच्या माध्यमातून पोहोचविता आले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये वाढ होऊन देशाचे एक जबाबदार नागरिक म्हणून त्यांच्यावर या माध्यमातून संस्कार घडविले गेले जिल्हा स्तरावरील विविध उपक्रमात स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला त्यात प्रामुख्याने श्रमदान या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महाविद्यालय आणि परिसरामध्ये श्रमदान करून आपल्या राष्ट्रीय सेवा कार्याची ओळख निर्माण करून दिली.

**थोर नेत्यांच्या जयंती कार्यक्रम:**

यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर. शंकरराव चव्हाण, लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे, महात्मा गांधी लालबहादूर शास्त्री, मौलाना अब्दुल कलाम, यशवंतराव चव्हाण, महात्मा फुले सावित्रीबाई, फुले छत्रपती शिवाजी महाराज, गाडगे महाराज, स्वामी विवेकानंद मॉ जिजाऊ, इंदिरा गांधी राजीव गांधी थोर नेत्यांच्या जयंत्या महाविद्यालयामध्ये उत्साहाने साजरा करण्यात आल्या.

**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन आणि सप्ताह:**

यामध्ये प्रामुख्याने जागतिक पर्यावरण दिन, वृक्षारोपण सप्ताह , आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन विरोधी दिन, सद्भावना दिन, शिक्षक दिन, राष्ट्रीय सेवा योजना दिन ,राष्ट्रीय एकात्मता दिन, मानवी हक्क दिन, एड्स जनजागरण सप्ताह, संविधान दिन असे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिनानिमित्य महाविद्यालयातून विद्यार्थ्यांचे या विशेष प्रसंगी उद्बोधन केले. तसेच महाविद्यालयात कोरोणाचा प्रादुर्भाव असल्याकारणाने दरम्यानच्या काळात उपक्रम कोरोणाच्या सर्व नियमांचे पालन करून ण्यात आला

**वृक्षारोपण कार्यक्रम** ;

दिनांक 14 /07/2021 रोजी महाविद्यालय परिसरामध्ये श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. शेंदारकर कार्यकारणी सदस्य पांडूरंगजी पावडे, प्राचार्य डॉ आर.पी. माळी, प्रा.डॉ भागवत पस्तापूरे प्रा. डॉ. राजकुमार पवळे, प्राडॉ.. मिर्झा बेग डॉ. विशाल मस्के यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम राबविला गेला. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

दिनांक 28/07/2021 रोजी महाविद्यालय परिसरामध्ये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. डॉ. शिवराज बोकडे प्राचार्य डॉ आर.पी. माळी, प्रा. डॉ भागवत पस्तापूरे प्रा. डॉ. सुमंत तुगावकर प्रा.डॉ. मिर्झा बेग प्रा. डॉ. हरीहर मोहकर, प्रा. डॉ. विशाल मस्के प्रा.डॉ.अवधूत शिंदे प्रा.डॉ. बाबुराव घायाळ, प्रा.डॉ. राम मेटकर, प्रा.डॉ. गजानन पाटील,प्रा.डॉ. दिगांबर कदम, प्रा.डॉ. शिवराज देशमुख , प्रा.डॉ. संजय जगताप प्रा.डॉ. एफ. एम.सौदागर आणि श्री विठ्ठल पुय्यड मोहम्मद अतिक आणि श्री मनोज पवार वृक्षरोपन करतांना

दिनांक 29 /07/2021 रोजी महाविद्यालय परिसरामध्ये वृक्षरोपन करतांना श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सचीव डी. पी. सावंत, प्राचार्य जी.एन. शिंदे, प्राचार्य डॉ आर.पी. माळी, प्रा संजय जगताप प्रा.डॉ. भागवत पस्तापूरे प्रा.डॉ. मिर्झा बेग डॉ. विशाल मस्के यांच्या हस्ते वृक्षरोपण कार्यक्रम राबविला गेला. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व स्वयंसेवक आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक या कार्यक्रमात सहभागी झाले होते. महाविद्यालय परिसर स्वच्छ आणि सुंदर व नैसर्गिक पर्यावरणात ठेवण्यासाठी वेळोवेळी विद्यार्थी आणि मान्यवरांनी महाविद्यालयीन परिसरामध्ये वृक्षारोपण केले

दिनांक 01 /08/2021 रोजी महाविद्यालय परिसरामध्ये **“माझी वसुंदरा” उपक्रमांतर्गत वृक्षलागवड** या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालय परिसरात याप्रसंगी वृक्षारोपण करून परिसराची स्वच्छता करण्यात आली याप्रसंगी महाविद्यिालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. माळी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे सहकार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. विशाल मस्के उपस्थित होते. यावेळी पुढील प्रा. डॉ. संजय जगताप प्रा. डॉ. बाबुराव घायाळ ग्रंथपाल डॉ. शिवराज देशमुख प्रा. डॉ. एफ.एम. सौदागर प्राध्यापकांनी वृक्ष दान करून महाविद्यालय परिसर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी मदत केली अन्य प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी वृक्षलागवड कार्यक्रमात सहभागी झाले होते. महाविद्यालय परिसरात वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धन व परिसर सुशोभित करण्यास वृक्षलागवडीच्या माध्यमातून मदत केली या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाच्या उपस्थितीत वृक्ष लागवड करण्यात आल

**स्वच्छ,सुंदर व सुदृढ पर्यावरणासाठी विद्यार्थ्यांनी वेळोवेळी केलेली स्वच्छता**

दिनांक 28/112021 रोजी महाविद्यालय परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात गवत वाढले होते ते विद्यार्थ्यांनी पूर्णपणे साफ करून परिसर स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी मोलाची मदत केली दिनांक 29/112021 महाविद्यालयातील परिसर संपूर्ण प्लास्टिक मुक्ती साठी विद्यार्थ्यांनी पूर्णतः परिश्रम घेऊन प्लास्टिक मुक्त महाविद्यालय ठेवण्यासाठी परिश्रम घेऊन परिसरातील संपूर्ण प्लास्टिक जमा करून महाविद्यालयाच्या डम्पिंग ग्राउंड मध्ये टाकून महाविद्यालय प्लास्टिक मुक्त होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी हातभार लावला.दिनांक 18/12/2021 राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक आणि स्वयंसेवक यांनी महाविद्यालयातील समोरच्या माणसाची गार्डनमधील साफसफाई करून स्वच्छ आणि सुंदर महाविद्यालयाचा संदेश स्वर्ग महाविद्यिालयास करून देण्यासाठी परिश्रम घेऊन महाविद्यालय करण्याचा प्रयत्न केला.दिनांक 28/12/2021 महाविद्यालयाचा इथले समोरील खो-खो चे मैदानात आणि

हॉलीबॉल मैदानाची संपूर्णपणे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी साफसफाई करून विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे संदेश देण्याचे काम या माध्यमातून केले.

**उद्बोधन शिबिर**

**28/07/2021 रोजी सकाळी ठीक 12:00** वाजता महाविद्यालयातील सेमीनार हॉलमधे आयोजीत रासेयोच्या **उद्बोधन शिबिराचे आयोजन** करण्यात आले. या शिबिरा करिता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. शिवराज बोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती यापप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. माळी यांची प्रमुख उपस्थिती होती याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभाग नांदेड जिल्हा समन्वयक भागवत पस्तापूरे तर सहकार्य क्रमाआधिकारी विशाल मस्के उपस्थित होते. डॉ. शिवराज बोकडे यांनी विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास साध्य करायचा असेल तर सातत्याने परिश्रम करणे गरजेचे आहे. आणि त्याकरिता त्यातील हा विकासाचा राष्ट्रीय विकासाचा मानबिंदू आहे असे त्याकरिता त्यांनी समृद्ध भारतासाठी सुदृढ युवकांची नितांत गरज आहे असे प्रतिपादन केले. प्राचार्य आर माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक बालाजी जाधव यांनी केले तर आभार विशाल मस्के यांनी मानले कार्यक्रमाचे प्रास्ताविक भागवत पस्तापूरे यांनी केली कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दिन**

**जागतिक पर्यावरण दिन**

दिनांक 5 जून 2021 रोजी महाविद्यालय परिसरात वृक्ष लागवड करून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त डॉ राजकुमार पवळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे तरच आपल्या दहावी लिहा या साधन संपत्तीचा उपयोग करणे अन्यथा आपण दिसणा-या साधनसंपत्तीच्या वारेमाप पद्धतीने वापर केला तर भविष्यात फार मोठी संकट उभे राहील असा इशारा दिला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राचार्य आर माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक भागवत पस्तापूरे यांनी केले तर आभार विशाल मस्के यांनी मानले कार्यक्रमाचे कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

**अक्षय ऊर्जा दिन**

दिनांक20/08/2021 रोजी अक्षय ऊर्जा दिन म्हणून पाळण्यात आला माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीदिनी अक्षय उर्जा दिन म्हणून साजरा करण्यात आला सर्वप्रथम राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य आर.पी माळी होते. तर प्रमुख वक्ते म्हणून विशाल मस्के यांची उपस्थिती होती डॉ. विशाल मस्के यांनी विद्यार्थ्यांना अक्षय उर्जा दिनाचे महत्त्व अधोरेखित करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी भागवत यांनी केले तर आभार अध्यापक प्राडॉ एफ. एम. सौदागर यांनी केले या कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

**जागतिक एड्स दिनानिमित्त कार्यक्रम अहवाल.**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको, नांदेड. येथे राष्ट्रीय सेवा योजना,आय.क्यू.ए.सी.व जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग, सामान्य रुग्णालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने "स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त **दिनांक 1 डिसेंबर 2021** रोजी सकाळी ठीक 12:00 वाजता महाविद्यालयातील आयसीटी हॉल येथे 'जागतिक एड्स दिन' हा उपक्रम राबविला गेला.

कार्यक्रम मुख्यतः दोन सत्रांमध्ये घेण्यात आला. त्यामध्ये पहिली सत्र उद्घाटन आणि व्याख्यानाचे होते दुसऱ्या सत्रामध्ये समुपदेशन आणि HIV टेस्ट असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

**सत्र-I**

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालये प्राचार्य डॉ राजेंद्र माळी, कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ.कुलदीपक अंकुशे ( जिल्हा कार्यक्रम अधिकारी, सामान्य रुग्णालय नांदेड) दिपाली सोमेश्वर पेठकर (समुपदेशक,आय.सी.टी.सी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सूक्ष्मजीवशास्त्र विभाग विष्णुपुरी नांदेड) श्री सुनील जमराज(प्रयोगशाळा तंत्रज्ञ,आय.सी.टी.सी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सूक्ष्मजीवशास्त्र विभाग विष्णुपुरी नांदेड) श्री पांडागळे, श्रीनिवासन. डॉ. भागवत पस्तापुरे, डॉ.मिर्झा सुलतान बेग, प्रा. विशाल मस्के उपस्थित होते.

प्रथमतः मान्यवरांचे स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे यांनी केले या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून **डॉ. कुलदीप अंकुशे** यांनी कार्यक्रमाचं उद्घाटन करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते असे म्हणाले की, एड्स हा आजार असा आहे की, या आजारा संबंधित माहिती घरात, कुटुंबात आणि मित्रमंडळी मध्ये चर्चा करत नाही.पण हा जिवघेणा आजार असल्याने या विषयी माहिती असणे आवश्यक आहे.तरूण वयात या आजाराविषयी माहिती दिली तर त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये रूजली जातील. अनैतिक संबंध, रक्त पुरवठा, गरोदर स्त्रिया,आणि दुषीत इंजेक्शन या गोष्टी खबरदारी घेतली तर या आजारापासून बचाव करता येईल असे ते याप्रसंगी म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालये **प्राचार्य डॉ राजेंद्र माळी** म्हणाले की,या उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती झाली पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. कोरोना महामारी रोगाशी मुकाबला करण्यासाठी प्रतिकारशक्ती आवश्यक आहे.या प्रतिकारशक्तीचा संबंध एड्स या भयंकर आजाराशी आहे.कुठलाही विषाणू पूर्णपणे मरत नाही.त्यावर प्रभावी औषध नाही. जनजागृतीमुळेच आज आपण एड्स आजारांवर काही प्रमाणात नियंत्रण करू शकलो.या दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आपली प्रतिकारशक्ती वाढवावी असे आवाहन त्यांनी केले.

**सत्र -II**

कार्यक्रमाचा दुसऱ्या सत्रात **दिपाली सोमेश्वर पेठकर** यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचे स्वतंत्र प्रश्न घेऊन दोघांनाही स्वतंत्र रित्या विचारलेल्या व लिखित प्रश्नांची उत्तरे दिली आणि समुपदेशन केले

यामध्ये जवळपास 20 विद्यार्थीनींनी आपले प्रश्न विचारले. गेले सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देऊन विद्यार्थ्यांची समाधान करण्यात आले.

कार्यक्रमास प्रयोगशाळा तंत्रज्ञ, **श्री सुनील जमराज** यांनी एड्स टेस्ट करणे अत्यंत गरजेचे आहे सर्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. याप्रसंगी 25 विद्यार्थ्यांनी HIV टेस्ट केली. टेस्ट चा निकाल विद्यार्थ्यांना लागलीच सांगण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांचा टेस्ट रिपोर्ट निगेटिव्ह आला आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.ए.टी.शिंदे, डॉ.नामदेव वाघमारे, डॉ शंकर विभुते, डॉ.राम मेटकर, डॉ . राजकुमार पवळे, डॉ.शिवराज देशमुख, कार्यालयीन अधिक्षक श्री वडवळे, प्रकाश हंबर्डे, भीमराव ताळीकुठे श्री विठ्ठल पुयड, श्री दिलीप डहाळे , श्री संजय यलसटवाड, श्री संजय कोमटवार यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमासाठी जवळपास 52 राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक /विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भागवत पस्तापुरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बालाजी जाधव यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विशाल मस्के यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

**संविधान दिन**

दिनांक26/11/2021 रोजी संविधान दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर पी. माळी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून यशवंत महाविद्यालय नांदेड येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. अजय गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भागवत पस्तापुरे यांनी केले कार्यक्रमात डॉ. अजय गव्हाणे पुढील बोलताना असे म्हणाले की आज आज देशाला खऱ्या अर्थाने तरुणांची गरज आहे. आणि तुम्ही सर्वजण राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आहात खऱ्या अर्थाने माझ्यासाठी नव्हे मी तुझ्यासाठी ही ब्रीदवाक्य घेऊन ज्यांच्या धमन्यातून सळसळत रक्त वाहते अशा तरुणांच्या हाती राष्ट्र दिल्यानंतर तरुणांमध्ये प्रचंड राष्ट्रउभारणीची उमेदआहे. संविधान दिनाचे औचित्य साधून संविधानाचा प्रत्येकानी गौरव केला पाहिजे प्रत्येकाने समविधन नीटपणे समजून घेवून वाचले पाहिजे आणि संविधानाप्रमाणे आपण सर्वांनी आचरण केले पाहिजे संविधाना प्रति आपल श्रद्धा निष्टा ठेवलो पाहिजे कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भागवत पस्तापुरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बालाजी जाधव यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विशाल मस्के यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

**कोरोना जनजागृती अभियान**

दिनांक 29/08/2021 रोजी **"माझे कुटुंब माझी जबाबदारी"** अंतर्गत कोरोना-19 जनजागृती अभियानाअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या नियमांचे पालन करून अवतीभवतीच्या परिसरामध्ये लोकांमध्ये कोरोना विषयीसमाजामध्ये असणारे समज आणि गैरसमज

दुरु करून त्यांच्यामध्ये आत्मिक बल निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून सर्वांनी पाहिले पाहिजे शिवाय स्वच्छता वारंवार साधने हात धुणे मुखपट्टीचा वापर करणे अशा शासनाने ठरवून दिलेली त्रिसूत्री अंमलात आणून आपलं आरोग्य अबाधित ठेवता येईल यासाठी समाजामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून जागृती करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केले. त्याचाच एक भाग म्हणून **"कोरोना आजारापूर्वी, कोरोना संक्रमण काळातील आणि भविष्यातील कोरोनाची वाटचाल"** या विषयावर ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलं या कार्यक्रमात जवळपास 70 विद्यार्थी आणि पालकांनी सहभाग नोंदवला. यासाठी तज्ञ डॉक्टर अशोक भिसे आणि दुसरे तज्ञ डॉक्टर संभाजी मुंजाजी शिंदे यांनी विद्यार्थी व पालकांना कोरोना-19 महामारी पासून कशा पद्धतीने आपण आपली काळजी घेऊन दूर ठेवलं पाहिजे. आणि ज्यांना यथासंभव झाला असेल अशांनी व्यवस्थितपणे त्याचा सामना करून कोराना- 19 महामारीवर मात केली पाहिजे. असा संदेश देऊन सर्वांवरचे कोराना संकटाचे दडपण कमी करण्याचा प्रयत्न केला.

**कोरोना महामारी वरील लस्सीचे महत्व**

दिनांक 28/10/2021 रोजी कोरोना सारख्या महामारी तून संपूर्ण जग जात असताना भारत आणि महाराष्ट्र मध्ये मोठ्या प्रमाणात कोरोनाची लागण झालेले रुग्ण आढळली होती शास्त्रज्ञांच्या अथक परिश्रमातून कोणावरची लस तयार झाली आणि ही लस तयार झाल्यानंतर लस घेण्यासाठी लोकांमध्ये काही समज गैरसमज पसरत होते. कोणती लस घ्यावी कोणती घेऊन येऊ लस घेतल्यानंतर काय करावे. हा लोकांच्या मनातील संभ्रम दूर व्हावा यासाठी लसीकरण मोहीम घेण्याअगोदर एका विशिष्ट कार्यक्रमातून लस घेणं किती गरजेचं आहे. आणि कशा पद्धतीनं सुरक्षित आहे. या अनुशंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन शारदा शिक्षण संस्थेचे कोषाध्य प्राचार्य डॉ.रावसाहेब शेंदारकर यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नांदेड शहर वाघाळा महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे डॉक्टर हमीद यांनी विद्यार्थ्यांच्या शंकाकुशंका दूर करून लसीकरण करून घेणे किती महत्वाचे आहे याविषयी माहिती सांगितली.

**"मिशन कवच-कुंडल"**

दिनांक 28/10/2021 रोजी मिशन कवच-कुंडल अंतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना covid-19 लसीकरणा करिता परावृत्त करून विद्यार्थ्यांचे लसीकरण करणे अत्यंत गरजेचे होते. म्हणून आमच्या महाविद्यालयाने नांदेड शहर वाघाळा महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लशीकरण करून घेण्यासाठी त्यांच्या आरोग्य विभागाला पाचारण करण्यात आले. त्याअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लसीकरण मोहिमेत सहभाग नोंदवला त्याअंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी आणि पालक असे मिळून जवळपास 90 जणांचे लशीकरण झाले.



महाविद्यालयातील परिसर स्वच्छ केल्यानंतर विद्यार्थीसमवेत प्राचार्य डॉ. माळी आर.पी.व इतर



बोलताना डॉ. कुलदीप अंकुशे मंचावर बसलेले डावीकडून प्रा. डॉ. भागवत पस्तापुरे, मा. कल्याणकर प्रयोगशाळा तंत्रज्ञ जमराज, प्राचार्य आर. माळी, प्रा.डॉ. सुलतान मिर्झा बेग व प्रा.डॉ. विशाल मस्के सर्व सहभागी सर्व विद्यार्थी










राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त अर्पण करताना प्रा डॉ. पाटील व प्रा. डॉ. उमेश सिंह बायास दिनांक 02 ऑक्टोबर 2021




9/03/2022 भारत सरकारच्या प्रादेशिक कार्यालय पुणे येथील सहाय्यक कार्यक्रम सल्लागार डी.कार्तिकेयन, महाराष्ट्र राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी प्रशांतकुमार वनंजे, महाराष्ट्र व गोवा राज्याचे राष्ट्रीय सेवा योजना अहमदनगर येथील प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक प्रा. शरद बोरुडे, महाराष्ट्र व गोवा राज्याच्या रासेयो वित विभागाचे लेखापाल श्री खैरणार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्रा. डॉ. शिवराज बोकडे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. डॉ. ज्ञानोबा मुंडे, प्राचार्य डॉ आर.पी. माळी प्रा. भागवत पस्तापूरे व भूगोल विभाग प्रमुख प्रा.एन.के. वाघमारे




**13/06/2021 रोजी अ□णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करताना प्रा.डॉ.एन. के. वाघमारे प्राचार्य आर.पी. माळी, प्रा.डॉ. भागवत पस्तापूरे**





वृक्षारोपण करतेवेळी श्री.शा. भ.एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ रावसाहेब शेंदारकर कार्यकारिणी सदस्य पांडूरंगजी पावडे प्राचार्य आर.पी. माळी प्रा. .डॉ सुलतान बेग मिर्झा प्रा.डॉ. भागवत पस्तापूरे, प्रा.डॉ. मस्के विशाल




वृक्षारोपण करतेवेळी श्री.शा. भ.एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा.डी.पी. सावंत प्राचार्य जी. एन. शिंदे प्राचार्य आर.पी. माळी प्रा. .डॉ सुलतान बेग मिर्झा प्रा.डॉ. भागवत पस्तापूरे, प्रा.डॉ. मस्के विशाल

I









**स्वा.रा.तिर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रासेयो विभागाचे संचालक प्रा.डॉ. शिवराज बोकडे रासेयो उद्बोधन शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ..आर.पी.माळी व इतर**




**राजीव गांधी सद्भावना दिन साजरा करते वेळी प्राचार्य आर.पी. माळी  प्रा.डॉ. भागवत पस्तापूरे, प्रा.डॉ. मस्के विशाल**

**।**




**कोविड- 19 विषयावर ऑनलाईन व्याख्यान करतांना डॉ अशोकभिसे ,डॉ संभाजी शिंदे,प्राचार्य आर.पी. माळी**

# इंदिरा गांधी महाविद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त व्याख्यान संपन्न

नांदेड/प्रतिनिधी

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको नांदेड येथे राष्ट्रीय सेवा योजना, आय.क्यू.ए.सी.व जिल्हा एड्स प्रतिबंधक व नियंत्रक विभाग, सामान्य रुग्णालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने "स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'जागतिक एड्स दिन' हा उपक्रम राबविला गेला.

कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ.कुलदीपक अंकुशे म्हणाले की,हा आजार असा आहे की, या आजारा संबंधित माहिती घरात, कुटुंबात आणि मित्रमंडळी मध्ये चर्चा करत नाही.पण हा जिवघेणा आजार असल्याने या विषयी माहिती असणे आवश्यक आहे.तरूण वयात या आजाराविषयी माहिती दिली तर त्यांच्यामध्ये नैतिक मूल्ये रूजली



जातील. अनैतिक संबंध, रक्त पुरवठा, गरोदर स्त्रिया,आणि दुषीत इंजेक्शन या गोष्टी खबरदारी घेतली तर या आजारापासून बचाव करता येईल असे ते याप्रसंगी म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाविद्यालये प्राचार्य डॉ राजेंद्र माळी म्हणाले की,या उपक्रमाच्या माध्यमातून जनजागृती झाली पाहिजे असे शासनाचे धोरण आहे. कोरोना महामारी रोगाशी मुकाबला करण्यासाठी प्रतिकारशक्ती आवश्यक आहे.या प्रतिकारशक्तीचा संबंध एड्स या भयंकर आजाराशी आहे.कुठलाही विषाणू पूर्णपणे मरत नाही.त्यावर औषध नाही. जन जागृतीमूळेच आज आपण एड्स आजारांवर काही प्रमाणात नियंत्रण करू शकलो.या दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आपली प्रतिकारशक्ती वाढवावी असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास प्रयोगशाळा तंत्रज्ञ, श्री सुनील जमराज,श्री पांडागळे, दिपाली सोमेश्वर पेठकर ( समुपदेशक,आय.सी.टी.सी..) डॉ.मिर्झा सुलतान बेग, डॉ.ए.टी.शिंदे, डॉ. नामदेव वाघमारे, डॉ शंकर विभुते, डॉ.राम मेटकर, डॉ . राजकुमार पवळे, डॉ.शिवराज देशमुख, बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा डॉ भागवत पस्तापुरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बालाजी जाधव यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विशाल मस्के यांनी केले.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

# इंदिरा गांधी महाविद्यालयात युवक दिन व जिजाऊ जयंती

नवीन नांदेड,दि.१२(प्रतिनिधी)– शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आज राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. माळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. भागवत पस्तापुरे यांनी केले .सूत्रसंचालन सहाय्यक प्रा.जाधव तर आभार सहकार्यक्रमाधिकारी रासेयो डॉ. विशाल मस्के यांनी मानले.

Program Officer
National Service Scheme
Indira Gandhi Sr.College,
CIDCO,Nanded

Dr. Mirza S.B.
Director
Internal Quality Assurance Cell
Indira Gandhi (Sr.) College,
CIDCO,New Nanded. (M.S.)

Indira Gandhi (Sr.) College ★ CIDCO, New Nanded. (M.S.) ★ Principal

Principal
Indira Gandhi (Sr.) College,
CIDCO, New Nanded. (M.S.)